क्रमांक: पोआअ/विशा/आदेश/२५२४/२०१८
पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर.
दिनांक–०५/११/२०१८

# मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१)(यु) अन्वये अधिसुचना

ज्याअर्थी दिनांक ०२/११/२०१८ ते ०९/११/२०१८ या कालावधीत अमरावती पोलीस आयुक्तालयाच्या हददीत दिपावली सन मोठया प्रमाणात साजरा होणार आहे.त्या निमित्ताने अमरावती पोलीस आयुक्तालयाच्या हददीत सणाच्या अगोदर व नंतरही काही दिवस नागरीक मोठया प्रमाणावर फटाके उडवितात.मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.२/११/२००१ रोजीचे निर्णयानुसार दिवाळी व इतर सणाच्या वेळी मोठया आवाजाचे फटाके उडविण्यामुळे निर्माण होणा–या ध्वनी व हवा प्रदुषणाचे जनतेवर होणारे संभाव्या अपायकारक परिणाम टाळण्यासाठी असे फटाके वाजविण्यावर निर्बंध घालने बावत आदेश दिलेले आहेत.तसेच पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ अंतर्गत पर्यावरण (संरक्षण) नियम व सुधारीत नियम ८९ जे फटाक्याच्या आवाजाच्या मानांकनांबावत आहेत.त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबतचे आदेश .देण्यात आलेले आहेत.मान्यताप्राप्त संवर्गातील नसलेले फटाके उडविणे तसेच शोभेचे दारूकाम निष्काळजीपणाने करणे इत्यादी संभाव्या कृत्यामुळे जनतेच्या जिवीतास व मालमततेस हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे अशाप्रकारे हाणी होवुनये,म्हणुन तसेच रहदारीचे नियमासाठी व सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी मनाई आदेश काढणे आवश्यक आहे.याबावत माझी खात्री झालेली आहे.

ज्याअर्थी मी,संजयकुमार बाविस्कर,पोलीस आयुक्त अमरावती शहर, मला मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३(१) व्दारा प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून अमरावती पोलीस आयुक्तालय हददीसाठी खालीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

१) फटाका उडविण्याच्या जागेपासुन ४ मिटर अंतरापर्यंत १२५ डेसीबल आवाज निर्माण करणा–या फटाक्याचे उत्पादन,विक्री व वापर यावर बंदी घालण्यात येत आहे.

२) साखळी फटाक्यासाठी (Joint Fire Crackers) वरील १मध्ये नमुद केलेल्या आवाजच्या मर्यादेच्या पातळीत 5 Log 10 (N) डेसीबल पर्यंत शिथीलता देण्यात येत आहे.ज्यात N= एका साखळी फटाक्यांची एकुण फटाक्याची संख्या उदा. जर साखळी फटाक्यात एकुन ५०,५० ते १०० आणि त्यावरील फटाके असतील तर आवाजाची मर्यादा फटाका उडविण्याच्या जागेपासुन ४ मिटर अंतरा पर्यंत अनुक्रमे ११५,११० व १०५ डेसीबल एवढी असावी.

३) सुप्रिम कोर्टाच्या निर्देशानुसार दिवाळी या सणा निमीत्त जनतेला फटाक्याचे दारूकाम किंवा फटाके उडविणेस रात्री ०८.०० ते १०.०० वाजे पावेतो परवानगी राहील.म्हणजेच रात्री १०.०० ते दुस–या दिवशी रात्री ०८.०० वाजे पावेतो फटाक्याचे दारूकाम किंवा फटाके यांचा वापर करण्यात येवु नये.

४) फटाक्याची दुकाने जमीनीलगतच असावी परवाना प्राप्त प्रत्येक स्टॉल मध्ये १०० कि.ग्रॅम फटाके व ५०० कि.ग्रॅम चायनिज क्रॅकर (शोभेचे फटाके) यापेक्षा जास्त साठा असनार नाही.

Scanned by CamScanner

५) स्टॉलचे ठिकाणी तेलाचा दिवा, मेणबत्ती निषिध्द आहे.

६) विदयुत प्रवाह वायरींग योग्यरितीने केलेली आहे. याकडे विशेष लक्ष देण्यात यावे, विदयुत निरीक्षकांकडून प्रमाणीत करावे.

७) फटाक्याचा दुकानाचा आपतकालीन मार्ग हा नेहमी खुला असावा त्यात कुठल्याही प्रकारचा अडथळा नसावा. तसेच स्टॉलच्या ठिकाणी धुम्रपानास सक्त मनाई आहे.

८) योग्य अग्निप्रतिबंधक उपाययोजना केलेली असावी.

९) फटाके हाताळण्यासाठी पुरेशी जागा असावी. व दुकानात ग्राहाकांची गर्दी होवू देवू नये.

१०) कुठल्याही अपघातात तोंड देण्यासाठी योग्य सुरक्षा व्यवस्था केलेली असावी.

११) खराब स्थितीत असलेल्या कुठल्याही फटाक्याची विक्री होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

१२) २५ ग्रॅम पेक्षा जास्त वजनाचे, ३.८ से.मीटर पेक्षा जास्त लांबीचे व अॅटमबॉम्ब नावानेओळखले जाणा—या फटाक्याची व क्लोरटचा समावेश असलेली फटाके विक्री केली जाणार नाही.

१३) तीन इंचापेक्षा जास्त लांबीचा आणि अर्ध्या इंचापेक्षा जास्त व्यासाचे कागदाचे नळी पासुन केलेला गन पावडर व नायट्रेट मिश्रीत परंतु क्लोरेट नसलेल्या चिनीफटाक्यांची विक्री केली जाणार नाही.

१४) फुटफुटी किंवा तडतडी,मल्टीमिक्स, चिलपाल, चिडचिडीया, बटरफलाईज या नावाने ओळखले जाणा—या पिवळा फॉस्फरस युक्त असलेल्या अत्यंत विषारी असलेल्या फटाक्यांची विक्री केली जाणार नाही.

१५) शांतता प्रभागात कोणत्याही फटाक्यांचा वापर कुठल्याही वेळेत करण्यात येवू नये. शांतता झोनमध्ये रूग्णालय, शैक्षणिक संस्था इत्यादीच्या सभोवतालचे १०० मिटर पर्यतचे क्षेत्र येते. तसेच पेट्रोलपंप, केरोसिन व इतर ज्वालाग्राही पदार्थाचा साठा व विक्री करण्याचे ठिकाणापासुन १००मिटरचे परिसरात कोणत्याही फटाक्याचा वापरकुठल्याही वेळेत करण्यातयेवू नये.

१६) रॉकेट डोक्याचा भाग हा १०से.मी.पेक्षा जास्त लांबीचा नसावा व २.५ से.मिटर पेक्षा जास्त जाडीचा व्यास नसावा.

१७) आपटबांर व उखळी दारू उडविण्यास मनाई आहे त्याचप्रमाणे उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे फटाका विक्री धारक व नागरिकांनीपरदेशी फटाके बाळगू नये किंवा विक्री करू नये.

१८) १०,००० फटाकेपेक्षा जास्त लांबीची फटाक्याची माळ असता कामा नये त्यावर बंदी आहे.

१९) फटाका दुकानातील विक्रेता व कामगार यांना फटाक्याच्या घातक स्वरूपाबध्दलतसेच फटाके सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातुन कशी हाताळावीत, याचे योग्य प्रशिक्षण द्यावे.

२०) १८ वर्षा खालील मुलांना सोबत प्रौढ माणुस असल्याशिवाय फटाके विक्री करता येणार नाही.

२१) मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३३ (१)(यू) अन्वये केलेल्या नियम / आदेशाचा भंग केल्यास कलम १३१ (ख) (१) अन्वये आठ दिवसापर्यत इतक्याकारावासाची किंवा रूपये १२५०/— (अक्षरी एक हजार दोनशे पन्नास रूपया पर्यंत ) वाढविता येवु शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

Scanned by CamScanner

कलम १३१ (ख) (१) अन्वये आठ दिवसापर्यंत इतक्याकारावासाची किंवा रुपये १२५०/– (अक्षरी एक हजार दोनशे पन्नास रुपया पर्यंत ) वाढविता येवु शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

फटाके तयार करणारे व विक्री करणा–यानीही वरील नियमाचे काटेकोरपणे पालन करावे नागरिकांनी फटाके गर्दीचे ठिकाणी न उडविता मोकळया जागेत जेथे वस्ती व वर्दळ नाही अशा ठिकाणी उडवावेत. कोणत्याही परिस्थितीत फटाक्याचे आवाज हे १२५ डेसीबल पेक्षा जास्त असता कामा नये.

त्याचप्रमाणे मी असाही आदेश देत आहे की,मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १६३ नुसार या आदेशाच्या प्रती स्पष्ट दिसतील अशाप्रकारे पोलीस आयुक्तालय क्षेत्रातील सार्वजनिक ठिकाणी ठळक जागेवर सर्वसाधारण जनतेच्या नजरेस पडेल अशा ठिकाणी चिटकवुन व स्थानिक वृत्तपत्रात प्रादेशिक भाषेत प्रसिध्द करुन या आदेशास प्रसिध्दी द्यावी.

सदर अधिसुचना अमरावती शहर आयुक्तालय हद्दीत दिनांक ०५/११/२०१८ ते १०/११/२०१८ पावेतो अंमलात राहील.

( संजयकुमार बाविस्कर )
पोलीस आयुक्त अमरावती शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, अमरावती
यांनी या अधिसुचनेस व आदेशास सर्व स्थानिक वृत्तपत्रातुन प्रसिध्द करावे.

१) मा.पोलीस उपायुक्त परिमंडळ १,२ व मुख्यालय आयुक्तालय अमरावती
२) . सर्व सहा.पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्तालय, अमरावती
३) . सर्व पोलीस ठाणे प्रभारी /शाखा प्रभारी पोलीस आयुक्तालय अमरावती शहर.

यांना माहीतीस व योग्य कार्यवाहीस,सदरचा आदेश जनतेच्या माहितीकरीता नोटिस बोर्डावर लावावे.

**प्रत माहितीस ,**

मा. जिल्हाधिकारी अमरावती.
आयुक्त, महानगरपालिका, अमरावती.

Scanned by CamScanner